चारकोप पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक २८/१०/२०२६

''प्रेस नोट''

''ॲपल तसेच ॲमेझॉन सारख्या नामांकित कंपन्यांचे कस्टमर केअर प्रतिनिधी असल्याचे खोटे नाव धारण करून खोटी ओळख सांगुन त्यांच्या मोबाईल व लॅपटॉप मधील कॉल लॉग प्रमाणे देश विदेशाताल लोकांना कॉल करून त्यांची फसवणुक व ठगबाजी करणारे बोगस कॉल सेंटर चारकोप पोलीस ठाणेकडुन उध्दवस्त करून बोगस कॉल सेंटर चालवणारी आंतरराष्ट्रीय टोळी जेरबंद ''

दिनांक २६/१०/२०२६ रोजी २३.००वा चे पुर्वी पासून ए विंग, १३०४, ॲक्मे ॲव्हेन्यु, भाब्रेकर नगर, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई ६७ या ठिकाणी इसम नामे ०१) आसिफ हनिफ कुरेशी वय ३१ वर्षे, धंदा-ऑपरेटर, रा ठी गेट नं ०५, प्लॉट नं १०, रूम नं २८, ओल्ड कलेक्टर कंपाऊंड, फेमस बेकरीच्या समोरील गल्लीत, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई मो क्र ८६९३०२८०६६ व ०२) स्मार्ट पी जॉन वय ४० वर्षे, धंदा-ऑपरेटर, रा ठी ए विंग, १३०४, ॲक्मे ॲव्हेन्यु, भाब्रेकर नगर, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई ६७ मो क्र ९६२५४५०२२१, आधारकार्ड नं ५७६००७५९४४०९ यांनी ०१) शाहरूख शेख व महीला नामे ०२) सिमरन सिंग उर्फ सिमरन रंधवा यांच्या सांगण्यावरून आपसात संगणमताने स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी ते चालवत असलेल्या अनधिकृत कॉल सेंटरचे प्रतिनीधी न सांगता ते ग्राहकांस फसवणुकीचे उद्देशाने 'ॲपल तसेच ॲमेझॉन' या नामांकीत कंपनीचे कस्टमर केअर प्रतीनीधी असल्याचे खोटे सांगुन त्यांची स्वत:ची ओळख लपवुन खोटे नाव धारण करुन लॅपटॉपच्या साहाय्याने इंटरनेटचा वापर करुन परकीय नागरीकांकडुन पैशांची मागणी करून त्याचे रोखीकरण करून आर्थिक लाभ मिळवुन फसवणुक करून कॉलसेंटर सुरु ठेवले म्हणुन पोलीस हवालदार विजयकुमार सुर्यवंशी/चारकोप पोलीस ठाणे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे विरुध्द गु र क्र ८९८/२०२६ कलम ३१९(२), ३१८(४), ३(५) भा न्या सं सह कलम ६६ (सी) (डी) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपासात घटनास्थळ व परीसराचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. नमुद घटनास्थावरून ०४ लॅपटॉप, ०९ चार्जर, ०९ वॉकमन हेड फोन, ०४ मोबाईल्स, एक स्क्रिप्ट लिहीलेली डायरी इत्यादी साहीत्य जप्त करण्यात आलेले आहे. सदर जप्त मुद्देमाल हा इसम नामे ०१) आसिफ हनिफ कुरेशी वय ३१ वर्षे, धंदा-ऑपरेटर, रा ठी गेट नं ०५, प्लॉट नं १०, रूम नं २८, ओल्ड कलेक्टर कंपाऊंड, फेमस बेकरीच्या समोरील गल्लीत, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई व ०२) स्मार्ट पी जॉन वय ४० वर्षे, धंदा-ऑपरेटर, रा ठी ए विंग, १३०४, ॲक्मे ॲव्हेन्यु, भाब्रेकर नगर, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई ६७ यांचेकडे मिळुन आल्याने त्यांचेकडे केलेल्या चौकशीत ते पाहिजे आरोपी नामे शाहरूख शेख व महीला नामे सिमरन सिंग उर्फ सिमरन रंधावा यांच्या सांगण्यावरून अनधिकृत कॉल सेंटरमध्ये ऑपरेटर म्हणून काम करीत असून, ॲपल कंपनी व ॲमेझॉन कंपनीचे बोगस व खोटे कस्टमर केअर म्हणून काम करीत असून, त्यांच्या मोबाईल व लॅपटॉप मधील कॉल लॉग प्रमाणे ते मधील लोकांना कॉल करून त्यांची फसवणुक करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

<u>अटक केलेल्या आरोपींची नावे -</u>

०१) आसिफ हनिफ कुरेशी वय ३१ वर्षे, धंदा-ऑपरेटर, रा ठी गेट नं ०५, प्लॉट नं १०, रूम नं २८, ओल्ड कलेक्टर कंपाऊंड, फेमस बेकरीच्या समोरील गल्लीत, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई

०२) स्मार्ट पी जॉन वय ४० वर्षे, धंदा-ऑपरेटर, रा ठी ए विंग, १३०४, ॲक्मे ॲव्हेन्यु, भाब्रेकर नगर, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई ६७

<u>पाहिजे आरोपींची नावे:</u>

०१) शाहरूख शेख व ०२) महीला नामे सिमरन सिंग उर्फ सिमरन रंधावा

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री. मनोज शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग श्री. शशीकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-०२, श्री. संदीप घुगे व मा. सहा. पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, श्री महेशकुमार ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चारकोप पोलीस ठाणे, श्री. महेश बळवंतराव, यांच्या निर्देशाप्रमाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. महेंद्र सुर्यवंशी, स.पो.नि. राजु थोरात, पो.ह.विजय सुर्यवंशी, पो ह स्वप्निल शिंदे, पो.ह.घनशाम पाटेकर, पो शि मच्छिंद्र चव्हाण, पो शि तुषार शिंदे यांनी केली आहे.

गुन्हयाचा तपास चालू.....